**<u>ठळक बातम्या</u>**

- नवनिर्वाचित उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांचा राज्यपाल पदाचा राजीनामा, तात्पुरता कार्यभार आचार्य देवव्रत यांच्याकडे

- आपले सरकार वेबसाइटची सुधारित आवृत्ती २ ऑक्टोबरपासून, इतर वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या सरकारी सेवाही “आपले सरकार”वर उपलब्ध करुन देण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

- जीएसटीतल्या दरकपातीनंतर कमी होणाऱ्या दरांची माहिती दुकानात लावण्याच्या केंद्र सरकारच्या विक्रेत्यांना सूचना

आणि

- तिन्ही सेनादलातल्या १० महिला अधिकाऱ्यांच्या समुद्र प्रदक्षिणेला मुंबईतून सुरुवात

**<><><><>**

सी. पी. राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्यामुळे त्यांनी आज महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा राजीनामा दिला. गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सोपवला आहे.

**<><><><>**

आपले सरकार वेबसाइटची लोकाभिमुख, सुधारित आवृत्ती २ ऑक्टोबरपर्यंत सुरू करा. इतर विविध वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या शासनाच्या सेवा आणि योजना या वेबसाइटवर उपलब्ध करुन द्या, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत झालेल्या बैठकीत दिले. आतापर्यंत सेवा हक्क हमी कायद्यामध्ये सेवांचीच हमी दिली जात होती. यापुढे पात्रतेच्या निकषावर योजनांच्या लाभाची हमीही नागरिकांना देण्यात यावी, असंही त्यांनी सांगितलं.

**- - होल्ड - मुख्यमंत्री बाइट- -**

राज्य सरकारनं आज तब्बल १ लाख ८ हजार कोटीं रुपयांहून अधिक रकमेच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. या गुंतवणुकीतून एकूण ४७ हजारांहून अधिक रोजगारांची निर्मिती होणार आहे. या गुंतवणुकीपैकी कोकण विभागात ३५ हजार कोटींच्या गुंतवणुकीतून १६ हजार रोजगार, नाशिक विभागात एकवीसशे कोटींच्या गुंतवणुकीतून ६०० रोजगार आणि विदर्भात ७० हजार कोटींच्या गुंतवणुकीतून साडे ३० हजार रोजगारांची निर्मिती होणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांना मिळेल याकडे लक्ष द्यावं, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. त्यांनी आज मंत्रालयात विविध महामंडळाच्या कामाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. या योजना अधिक प्रभावीपणे राबवून त्यांचे परिणाम समाजाच्या तळागाळापर्यंत दिसून यावेत, यासाठी प्रशासनानं जबाबदारीनं काम करावं, अशा सूचना त्यांनी दिल्या.

अष्टविनायक गणपती मंदिर परिसर विकास आराखड्यांतर्गत कामांचाही अजित पवार यांनी आज आढावा घेतला. हा आराखडा पर्यटन वाढीबरोबरच राज्याच्या अर्थव्यवस्थेला बळ देईल. त्यामुळे याअंतर्गत सुरु असलेली विकासाच कामं दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करावीत, असं निर्देश त्यांनी दिले.

क्रीडा विभागाच्या विविध प्रश्नांसंदर्भातही पवार यांनी आज बैठक घेतली. यावेळी बारामती तालुक्यात कटफळ इथं प्रस्तावित जिल्हा क्रीडा संकुलाच्या आराखड्याचं सादरीकरण झालं. क्रीडा संस्कृतीच्या दर्जात्मक विकासासाठी नवीन क्रीडा धोरण तयार करावं, असे निर्देश त्यांनी दिले.

<><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा ऑगस्ट महिन्याचा सन्मान निधी आजपासून लाभार्थ्यांच्या खात्यात जमा व्हायला सुरुवात होईल. महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी ही माहिती दिली.

<><><><>

मराठा आरक्षणासंदर्भात काढलेल्या जीआरमधली संदिग्धता दूर करावी किंवा हा जीआर मागे घ्यावा अशी मागणी ओबीसी नेते, मंत्री छगन भुजबळ यांनी आज नाशिकमधे

वार्ताहर परिषदेत केली. केवळ शपथपत्राच्या आधारे जातीचं प्रमाणपत्र दिलं जाऊ शकत नाही, आरक्षणासारख्या संवैधानिक विषयात अशा प्रक्रियेचा अवलंब करणं धोकादायक आहे, असं भुजबळ म्हणाले. मुख्यमंत्र्यांचा हेतू चांगला असेल परंतु जीआरमधल्या तरतुदीमुळे ओबीसी प्रवर्गाचं नुकसान होऊ शकतं त्यामुळे हा मागे घ्यावा असं भुजबळ म्हणाले.

**<><><>**

जीएसटीतल्या दरकपातीनंतर कमी होणाऱ्या दरांची माहिती दुकानात लावण्याच्या सूचना केंद्र सरकारनं विक्रेत्यांना केल्या आहेत. घाऊक तसंच किरकोळ विक्रेते दोघांनाही हे फलक लावावे लागणार आहेत. तसंच जीएसटीच्या वेबसाइटवरही ही यादी प्रदर्शित करावी लागणार आहे. विविध उद्योग संघटनांच्या बैठकीत केंद्रीय अप्रत्यक्ष कर मंडळानं या सूचना केल्या. यामुळं ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किंमती किमान १० टक्क्यांनी तर वाहनांच्या किंमती १२ ते १५ टक्के कमी होण्याची शक्यता आहे. ग्राहकोपयोगी वस्तू निर्मात्या कंपन्यांनी या दरकपातीचा लाभ ग्राहकांपर्यंत योग्यरितीने पोहोचवण्याची खबरदारी घ्यावी, यासाठी सरकारनं त्यांना स्पष्ट निर्देश द्यावे अशी मागणीही संघटनांनी केली आहे.

या दरकपातीविषयी पालघरचे व्यापारी तुलसी जोशी यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया ऐकूया…

- **- होल्ड - बाईट- तुलसी जोशी - -**

- **<><><>**

लष्कर, नौदल आणि हवाई दलातल्या महिला अधिकाऱ्यांच्या सागरीमार्गे होणाऱ्या पहिल्यावहिल्या जगप्रदक्षिणेला आज मुंबईतून सुरुवात झाली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी दूरस्थ पद्धतीनं IASV त्रिवेणी या शिडाच्या नौकेवरच्या मोहिमेला रवाना केलं. लष्करातल्या लेफ्टनंट कर्नल अनुजा वरुडकर या १० अधिकाऱ्यांच्या मोहिमेचं नेतृत्व करत आहेत. याविषयी त्या म्हणाल्या.

- **होल्ड.. बाईट - अनुजा वरुडकर -**

२६ हजार १०० नॉटिकल मैलांपेक्षा जास्त प्रवास करून पुढच्या वर्षी मे महिन्यात मुंबईत परतण्याचं त्यांचं नियोजन आहे.

**<><><>**

मुंबई महापालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार तसंच म्हाडा, एसआरए आणि इतर प्राधिकरणांनुसार बांधकाम झालेलं असूनही विविध कारणांमुळे अद्याप भोगवटा प्रमाणपत्र न मिळालेल्या २५ हजारांहून अधिक इमारतींना हे प्रमाणपत्र देण्याबाबत राज्य सरकार धोरण तयार करत आहे, असं मुंबईचे पालकमंत्री आशिष शेलार यांनी आज ही माहिती दिली. नगर विकास विभाग २ ऑक्टोबरपासून हे नवे धोरण लागू करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

अकोला इथं २०२३ मधे झालेल्या दंगलीचा तपास करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. या दंगलीत जखमी झालेल्या व्यक्तीनं यासंदर्भात केलेली मागणी मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळली होती. मे २०२३ मधे समाजमाध्यमावरील एका वादग्रस्त पोस्टवरून अकोल्यात दंगल भडकली होती.

<><><><>

बीड जिल्ह्यातल्या परळी वैजनाथ शहरात पंचायत समिती कार्यालयात कार्यरत असणारे विस्तार अधिकारी विलास डोगरे यांनी आज गळफास लावून आत्महत्या केली. आत्महत्येचं कारण अद्याप समजलेलं नाही. पोलीस पुढील तपास करत आहेत.

<><><><>

गडचिरोली जिल्ह्यामध्ये पोर्ला वनक्षेत्रात एक शेतकरी रानटी हत्तीच्या हल्ल्यात ठार झाला आहे. हा शेतकरी काल चुरचुरा-पिपरटोला परिसरात गुरांना चरायला घेऊन गेला होता. संध्याकाळी घरी परतताना वाटेत रानटी हत्तींच्या कळपाशी त्यांची गाठ पडली. यातल्या एका हत्तीने त्याच्यावर हल्ला केल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

<><><><>

कोल्हापूरात शारदीय नवरात्रौत्सवाच्या काळात भाविकांची गर्दी नियंत्रित करण्यासाठी प्रथमच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जाणार आहे, अशी माहिती पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे सचिव शिवराज नाईकवाडे यांनी दिली. यामुळे भाविकांच्या गर्दीवर नियंत्रण ठेवणं, दर्शन रांग सुलभ करणं तसंच गर्दीचा फायदा घेणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांवर लक्ष ठेवणं सोपं जाणार आहे.

<><><><>

मुंबई ते अहमदाबाद दरम्यानच्या बुलेट ट्रेनचं बांधकाम, पुरवठा आणि चाचणीसंदर्भात नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने लार्सन आणि टुब्रो कंपनीबरोबर करार केला. यात मुंबई बुलेट ट्रेन स्थान आणि महाराष्ट्र-गुजरात सीमेवरच्या झरोली गावादरम्यान एकूण १५७ किलोमार्गाचं संरेखन, चार स्थानकांसाठी रुळाचं काम आणि ठाणे इथल्या रोलिंग स्टॉक डेपोचा समावेश आहे.

//<><><><>//